**<u>नि.फौ.ख.क्रं. १३८/२०२२</u>** **<u>निशाणी क्र. २७</u>**
**<u>शासन .वि. राजु जांभुळकर व इतर</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०१ ची शपथेवर जबानी**

.......

**माझे नांव** – सरिता मंगेश मुंडरे
**वय** – ३० वर्षे, धंदा – शेती,
**राहणार** – पिंपळगांव, तालुका–चिमुर, जि.चंद्रपूर.

.......

**<u>सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत</u>**

**१.** मी सर्व आरोपींना ओळखते. आरोपींनी माझ्या सास–याला मारले होते. दि.१३/०३/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वाजता सदरची घटना घडली होती. सदरील दिवशी मी दिग्रजला भांडे नेण्यासाठी आले होते. त्यावेळी आरोपी आडवे आले व म्हणाले की, भांडे न्यायचे नाही. पहिले मी दिग्रज येथे राहत होते. माझ्या पतीने आरोपी क्र.१ राजु जांभुळकर यांची पत्नी पळवुन नेली होती. तेव्हा मी दिग्रज येथे सागर देवतळे यांच्या घरी राहत होते. त्यानंतर काही दिवसांनी मी चंद्रपूरला राहण्यासाठी गेली. दोन महिन्यानंतर मी भांडे नेण्यासाठी दिग्रजला आले. मी जेव्हा दिग्रजला आले तेव्हा माझे सासरे सागर देवतळे यांच्या घरामध्ये गहु उपसत होते. तेव्हा आरोपी तेथे आले व आरोपी क्र.१ व २ यांनी माझ्या सास–याला काडीने डोक्यावर, हातावर व पायावर मारले. तसेच आरोपींनी आमची भांडी व टिव्ही फोडली. सदरच्या घटनेमध्ये माझे सासरे जखमी होउन लंगडे झाले. माझ्या सास–याला मार लागल्याने रक्त निघाले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जाउन आरोपींविरुद्ध तक्रार दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.२८</u>** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.२९</u>** देण्यात येते. आरोपी क्र.३ ने आरोपी क्र.१ व २ ला माझ्या सास–याला मारण्यासाठी सांगितले. तक्रार दिल्यानंतर पोलीस चौकशीसाठी घरी आले होते. पोलीसांना

सदरचा घटनास्थळ मी दाखविली. ज्या काडयांनी आरोपींनी माझ्या सास–याला मारले होते, त्या काडया बघितल्यास मी ओळखु शकते. आता मला सदरच्या दोन्ही काडया दाखविण्यात आले. त्या त्याच असुन त्या **आर्टिकल–अ व ब** वर आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला**

**उलटतपास : आरोपींतर्फे विधीज्ञ व्ही.बी.गोमासे यांच्या मार्फत.**

२. मी पोलीसांना जबाब देतांना भांडे नेण्यासाठी आल्याचे सांगितले नव्हते. मी पोलीसांना जबाब देतांना सदरील दिवशी मी दिग्रजला भांडे नेण्यासाठी आले होते, त्यावेळी आरोपी आडवे आले व म्हणाले की, भांडे न्यायचे नाही, तेव्हा मी दिग्रज येथे सागर देवतळे यांच्या घरी राहत होते, त्यानंतर काही दिवसांनी मी चंद्रपूरला राहण्यासाठी गेली, दोन महिन्यानंतर मी भांडे नेण्यासाठी दिग्रजला आले, मी जेव्हा दिग्रजला आले तेव्हा माझे सासरे सागर देवतळे यांच्या घरामध्ये गहु उपसत होते, आरोपी क्र.३ ने आरोपी क्र.१ व २ ला माझ्या सास–याला मारण्यासाठी सांगितले होते, परंतु सदरचा मजकूर माझ्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, अक्षय बेले, सागर देवतळे, बंडुजी खडसे व निळकंठ चौधरी यांच्याशी माझे चांगले घरगुती संबंध होते. हे म्हणणे खरे आहे की, सागर देवतळे याचे सिंदी येथे घर आहे व तो १०.०० ते ११.०० वाजता दिग्रस येथील शेतावर येत असतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने आरोपी क्र.१ राजु जांभुळकर च्या पत्नीला पळवुन नेले होते, त्यामुळे माझे आरोपींशी पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपींशी माझे बोलचाल नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने सदरील महिलेला पळवुन नेल्यानंतर मी पिंपळगांव, चंद्रपूरला गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे दिग्रस येथे घर नाही.

४. घटनेनंतर एक तासाने मी रिपोर्ट देण्यासाठी पोलीस स्टेशनला गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिग्रस येथे दवाखाना आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास–याला दिग्रस येथील दवाखान्यात नेले होते. दिग्रस येथुन सिंदीला जाण्यासाठी दहा ते पंधरा मिनिट लागतात. हे म्हणणे खरे आहे की, मी सागर देवतळे यांच्याशी चर्चा करुन पोलीस स्टेशनला

तक्रार देण्यासाठी गेली होती. पोलीसांनी घटनेच्या एक महिन्यानंतर मला पोलीस स्टेशनला चौकशीसाठी बोलविले होते. त्यानंतर व त्यापुर्वी पोलीस स्टेशनला गेले नाही. त्यानंतर पोलीस ही घरी आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेबाबत मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनेच्या दिवशी पिंपळगांव येथुन मी माझे सासरे गाडीने प्रवास करत निघालो. हे म्हणणे खरे नाही की, त्या गाडीमधुन माझे सासरे पडले. हे म्हणणे खरे नाही की, गाडीतुन पडल्यामुळे माझ्या सास–याला हाताला, पायाला व डोक्याला मार लागला होता.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल–अ व ब वरील काडया सहजरित्या शेतामध्ये उपलब्ध होउ शकतात. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी प्रथमच सदरच्या काडया कोर्टात बघत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला सदरच्या काडया कधीही दाखविले नाही. घटनेच्या एका महिन्यानंतर मला पोलीसांनी काडया ओळखण्याकरिता बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या सास–याला डोक्याला, पायाला व हाताला मारले तसेच माझ्या सास–याला मार लागल्याने रक्त निघत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे गाडीवरुन पडल्यांचा गैरफायदा घेवुन आणि आरोपींविरुद्ध पटत नसल्यामुळे मी आरोपींविरुद्ध खोटी तक्रार दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.03.11 17:04:51 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**<u>दिनांक</u>** : ११/०३/२०२६